# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
ता. जि. ठाणे - ४०१ १०१, दुरध्वनी क्र. : २८१९ २८२८.

## || सामान्य प्रशासन विभाग ||

जा.क्र.मनपा/सा.प्र./१४१ /२०२२ - २३ दि.१२ /०८ /२०२२

### // परिपत्रक //

विषय : मुख्य आपत्ती व्यवस्थापन कक्षामधील कर्मचारी अनुपस्थितीबाबत.

संदर्भ : जा.क्र. मनपा/सा.प्र/139/2022-23, दि.13/07/2022 अन्वये आपत्ती व्यवस्थापन कक्ष नेमणुक आदेश.

उपरोक्त विषयान्वये मिरा भाईंदर शहरामध्ये घडणाऱ्या विविध आपत्तीच्या वेळी प्रतिबंधक उपाय योजनाकरणे, सदर आपत्तीच्या वेळेस बाधित नागरिकांना तत्परतेने मदत करणे इत्यादी बाबींचा समन्वय साधण्यासाठी महानगरपालिकेचा मुख्य आपत्ती व्यवस्थापन कक्ष कनाकीया अग्निशमन इमारत, तळमजला, सेव्हेन इलेव्हन स्कोलॅस्टीक स्कूल जवळ, कनाकीया, मिरा रोड (पूर्व) येथे मिरा भाईंदर महानगरपालिका कर्मचाऱ्याची तीन पाळयांमध्ये संदर्भिय आदेशान्वये कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे.

परंतु मा. आयुक्त सो, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त (मु.) तसेच आपत्ती व्यवस्थापन विभाग प्रमुख यांनी वेळोवेळी आपत्ती व्यवस्थापन कक्षामध्ये दिलेल्या भेटी दरम्यान अनेक कर्मचारी उपस्थित नसल्याचे निर्दशनास आले आह. ही बाब अत्यत गंभीर आहे.

तरी यापुढे संदर्भिय आदेशानुसार "आपत्ती व्यवस्थापन" कक्षामध्ये नेमुण दिलेल्या डयुटीच्या दिवशी कर्मचारी गैरहजर आढळुन आल्यास त्यावर आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 अंतर्गत कायदेशीर कार्यवाही करून निलंबनाची कारवाई करून चौकशी लावण्यात येईल याची स्पष्ट नोंद घ्यावी.

तरी संबधित कर्मचारी यांनी यांबाबत दक्षता घेण्यात यावी.

**(मारूती गायकवाड)**
**उपायुक्त (मु.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**